# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०१/२०१८

**१) घरातील नगदी पैश्याची व चांदीचे दागीण्याची चोरी . :–**

दिनांक २७/०१/२०१८ चे १२.३० ते२८/०१/२०१८ चे १३.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी प्रतिक भरत लांजेवार वय २८ वर्ष, रा. रामनगर पांढराबोडी रोड शुक्रवारी भंडारा हा आपले घर पुर्णपणे बंद करुन कुलुप लावुन तुमसर येथे गेला असता त्या संधीचा फायदा घेवुन फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील लोखंडी कपाटातील पर्स, बॅग व नगदी १०,०००/–रु, १ जोड चांदीची चाळ वजन ४ तोळे ४,०००/–रु. व दुसऱ्या कपाटातील नगदी ४०,०००/–रु. असा एकुण ५४,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक २८/०१/२०१८ चे १८.००ते १८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती मधु होमेश केडवदे वय ४२ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा ही बाजार करण्याकरीता आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ५००७ किंमती २०,०००/–रु. ने मोठा बाजार येथे गेली असता नव दुर्गा वॉच सेंटरचे बाजुला मोठा बाजार भंडारा येथे आपली मोटार सायकल ऊभी करुन बाजार करण्यास गेली असता बाजार करुन परत आली तेव्हा नव दुर्गा वॉच सेंटरचे बाजुला मोठा बाजार भंडारा येथे येवुन पाहीले असता मोटार सायकल ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) अश्लिल संदेश व चित्र प्रसारीत करुन धर्मा मध्ये धार्मीक व्देष निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/०१/२०१८ चे १४.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने रेणु आनंद व्यक्तीने फेसबुक अकाऊंट उघडुन त्यावर हिंन्दु देवी देवता बाबत अश्लिल संदेश व चित्र प्रसारीत करुन धर्मा मध्ये धार्मीक व्देष निर्माण हाईल अशी कृती केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९५(१),१५३(१) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) भांडण व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २८/०१/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा घरा जवळ ऊभा असतांना घरा शेजारील यातील आरोपी हे फिर्यादीचे घराकडे पाहुण शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने आरोपीतांना हटकले, असता आरोपीने त्यांचे सोबत भांडण केले त्यावेळी अनिकेत मेश्राम याला मारपीट केल्याने फिर्यादीचे तोंडाला लागुन दाताला साधी दुखापत झाली व फिर्यादीचे भावाला घसाटा मार लागला असुन भांडण सोडविनारा अनिकेत मेश्राम याला आरोपी क्र. २ ने चावला असुन आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी व त्याचे भावाला जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी संगम धरमदास मेश्राम वय २४ वर्ष रा. टेकपार डोडमाझरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फसविण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २८/०१/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही गावचे आनंदराव वठठी यांचे घरी वाढदिवसाच्या कार्यक्रमाला रस्त्यानी जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन तुने आमची पोलीस स्टेशनला तक्रार का केली? या कारणा वरुन आरोपी क्र. १ ने अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र. २,३,४ यांनी तिचे अध्यक्षपद काढा, असे म्हणुन आरोपी क्र. १ याने ॲट्रासिटीचे गुन्हयात फसविण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी :-**

दिनांक २८/०१/२०१८ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील जखमी नरेन्द्र आनंदराव तुरकर वय ५० वर्ष, रा. सिहोरा हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ वाय ५८२७ ने सिहोरा कडे येत असतांना यातील आरोपी चालकाने ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार सायकलला मछेरा नाल्या जवळ येथे धडक मारुन जखमी करुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवाल व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**७) विष प्राशन करुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :-**

दिनांक २८/०१/२०१८ चे १६.०० वाजता. दरम्यान यातील मृतक अजय सोंविदा ठवकर वय ३० वर्ष, रा. टवेपार याने विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता दिनांक २६/०१/२०१८ रोजी सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन व भावाचे बयाना वरुन सरतर्फे फिर्यादी पो.ना. पुराम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**८) किटकनाशक औषधी प्राशन करुन इसमाचा मृत्यु :-**

दिनांक २७/०१/२०१८ चे २२.०० ते २८/०१/२०१८ चे ०६.०० वाजता. दरम्यान यातील मृतक रामदास श्रावण भेंडारकर वय ४० वर्ष, रा. कुंभली याने फिर्यादीचे काका असुन ३ ते ४ वर्षापासुन किडनीचा व मनक्याचा त्रास होता. मृतक हा दिंनाक २७/०१/२०१८ चे रात्री २२.०० वाजता दरम्यान नेहमीप्रमाणे तो आपले घरी झोपला दिनांक २८/०१/२०१८ ला सकाळी ०६.०० वाजता दरम्यान फिर्यादीने शेनपानी करुन गावातील तलावाजवळ शेनखत टाकनेकरीता तलावाजवळील शासकीय जागेत काजुचे झाडाखाली मृतक हा झोपलेल्या स्थितीत दिसल्याने फिर्यादीने त्याला हलविले व उठविण्याचा प्रयत्न केला असता काहीच हालचाल केली नाही, त्याचे आजुबाजुला बघीतले असता थायमाईट किटकनाशक औषधी दिसुन आली. माझे काकाला पोटाचे किडणीचा व मनक्याच्या त्रासामुळे किटकनाशक औषधी प्राशन करुन मरण पावले असे फिर्यादी प्रशांत राम भेंडारकर वय ४० वर्ष, रा. कुंभली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंदीमेश्राम पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २८/०१/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो मॅक्स गाडी ही मोहाडी बस स्थानक येथील येणारे जाणारे लोकांना अडथडा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. तिवाडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

१०) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २८/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, लाखणी, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारू किंमती १,०००/–रु, ८ लिटर ३७० मिली लिटर देशी दारु + १ मोटार सायकल किंमती २२६०७/–रु. तसेच जुगारातुन किंमती ७४०/–रु. असा एकुण २४,३४७/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २८/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी ईतर वाहनांवरती – ६५ केसेस करण्यात आले आहे.

२९.१

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.